# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दुरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २(३)/एनजीसी/मान्यता/२०१७/४८
दिनांक : १२ जानेवारी, २०१७

## अधिसूचना

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेद्वारे [Advt.No.:Approval/१२(११)/२०१६] एआयसीटीई अॅप्रुव्हल प्रोसेस २०१७-१८ मधील मार्गदर्शक सूचनेच्या आधारे आणि अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (टेक्निकल इन्स्टिटयूशनकरिता मान्यतेला मंजूरी) नियम, २०१६ चे विनियम नुसार ऑन लाईन पध्दतीने दिनांक ५.१.२०१७ ते दि. ०४.०२.२०१७ पर्यंत व विद्यमान संस्थाच्या मान्यतेस विस्ताराबाबतचे अर्ज दि. ५.०१.२०१७ ते दि. ९.०२.२०१७ पर्यंत ऑन-लाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आलेले आहेत. त्यानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमासंदर्भात परिषदेस केलेल्या अर्जांवर शासनाचे अभिप्राय / शिफारस परिषदेस सादर करण्याच्या अनुषंगाने या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता http://www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळी दि. १६ जानेवारी, २०१७ पासून लिंक उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यासाठी संबंधित संस्थांनी संचालनालयाने दिलेला संकेतांक व पासवर्ड द्वारे लॉगइन करुन दि. १६ जानेवारी २०१७ पासून दि. ०५.०२.२०१७ पर्यंत व विद्यमान संस्थाच्या मान्यतेस विस्ताराबाबत दि १० फेब्रुवारी, २०१७ पर्यंत माहिती भरून भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करण्यात यावी.

२. विद्यमान पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या व शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये नविन तांत्रिक शिक्षण संस्था सुरू करणा-या संस्था प्रमूखांच्या निदर्शनास आणण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमांना मान्यता देण्याबाबत शासनाने बृहत् आराखडा [Perspective Plan] तयार केला असून तो संचालनालयाच्या संकेतस्थळी उपलब्ध आहे. तरी परिषदेस प्रस्ताव सादर करतांना बृहत् आराखडयामध्ये शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता उपलब्ध प्रवेशक्षमता विचारात घ्याव्यात.

३. विद्यमान पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद / वास्तुकला परिषद / फार्मसी कौसिंल ऑफ इंडिया यांना केलेल्या अर्जाची तपासणी करण्यासाठी या संचालनालयात सुनावण्या घेण्यात येतील. सुनावण्यांचे वेळापत्रक स्वंतत्रपणे या संचालनालयाच्या संकेतस्थळी प्रसिध्द करण्यात येईल.

- विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरू करणे.
- विद्यमान संस्थेतील सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ.
- आखाती देशातील ओसीआय / पीआयओ/ विदेशी / भारतीय कामगारांच्या मुलांकरीता नवीन जागा उपलब्ध करणे / पुढे चालू ठेवणे.
- अनिवासी भारतीयांच्या मुले / मुलींकरीता नवीन जागा उपलब्ध करणे / पुढे चालू ठेवणे.

४.	उपरोक्त परिच्छेद ३ मध्ये नमूद केलेल्या अर्जाच्या सुनावणीस येतांना खालील कागदपत्रांचे २ संच, तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अर्जात सादर केलेल्या माहितीच्या पृष्ठर्थची दस्तावेज, सन २०१७-१८ च्या ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक मध्ये नमूद केलेल्या मानके व प्रमाणकांच्या पृष्ठर्थ आवश्यक त्या मुळ कागदपत्रासह सुनावणीस प्राचार्यांनी व्यक्तीश: उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

१. संस्थेचा ठराव.
२. नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रीडीटेशन, नवी दिल्ली यांनी ॲक्रीडीटेशनास मान्यता दिलेल्या पत्राची साक्षांकीत प्रत
३. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विविध बाबींच्या मान्यतेसाठी शासनाने दि. २१.०८.२०१३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीची साक्षांकीत प्रत.
४. प्राचार्यांच्या नियुक्तीचे आदेश, नियुक्तीस विद्यापीठाची मान्यता व शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती.
५. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचा डेफीसिअन्सी रिपोर्ट (Submitted to R.O.).
६. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवर केलेल्या भाग १ व भाग २ च्या अर्जाची [submitted to R.O] साक्षांकीत प्रत.
७. ऑन लाईन पध्दतीने संचालनालयाच्या संकेत स्थळी माहिती भरल्यानंतर ॲनेक्सर सी व डी ची साक्षांकीत प्रत.
८. जमिन, इमारत, ओसी. इ. बाबत सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत
९. एआयसीटीई ॲप्रुव्हल प्रोसेस २०१७-१८ मधील Appendix १७ मधील १७.२, १७.४ व १७.५ मध्ये नमूद दस्तावेज.

उपरोक्त नमूद केलेल्या कागदपत्रांचे २ संच (स्पायरल) बायडींग स्वरुपात व मुखपृष्ठावर संस्थेचे नांव व डीटीई संकेतांकासह) सुनावणीच्या वेळी या कार्यालयास जमा करण्यात यावा

५. विद्यमान संस्थानी परिषदेस सादर केलेल्या खालील अर्जाच्या अनुषंगाने शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेहेतू या संचालनालयात सुनावणी न घेता प्रकरणपरत्वे शासनास प्रस्ताव सादर करण्यात येणार आहेत.

- संस्थेची साइट / ठिकाणातील बदल.
- महिला संस्थेचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन व त्याउलट.
- कोर्सच्या नावात बदल करणे
- संस्थेच्या नावात बदल करणे
- सध्या सुरू असलेले अभ्यासक्रम / शाखा बंद करणे किंवा प्रवेश क्षमतेत घट करणे.
- ट्रस्ट / सोसायटी / कंपनीच्या नावात बदल करणे
- संलग्न विद्यापीठाच्या नावात बदल करणे

वरील प्रस्तावासोबत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवर केलेल्या भाग १ व भाग २ च्या अर्जाची [submitted to R.O] साक्षांकीत प्रत, दि. २१.०८.२०१३ च्या शासन निर्णयान्वये

विहित केलेले नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीची साक्षांकीत प्रत, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या समावेशनाबाबत तसेच भविष्यात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्यास संस्था सर्वस्वी जबाबदार राहील, या आशयाचे रु.१००/- चे नोंदणीकृत लेखी प्रतिज्ञापत्र, व एआयसीटीई ॲप्रुव्हल प्रोसेस २०१७-१८ मधील Appendix १७ मधील १७.६ ते १७.९ मध्ये नमूद केले दस्तावेज इ. चे २ संच संस्थेच्या पत्रासोबत या संचालनालयास थेट सादर करावीत. येथे असेही नमूद करण्यात येते की, परिपुर्ण नसलेल्या अर्जावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नसून ते नस्तीबध्द / दप्तरी दाखल करण्यात येतील.

६. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या नवीन तांत्रिक संस्था / महाविद्यालये सुरू करणे, विद्यमान संस्थेची साईट / ठिकाणातील बदल, संस्था बंद करणे, पदविका स्तरावरुन पदवी स्तरावर परिवर्तन व त्याउलट इ साठी ज्या संस्थानी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस अर्ज / प्रस्ताव सादर केले असतील अशा संस्थांनी दि. ०५.०२.२०१७ पर्यंत प्रस्तावाच्या प्रतीसह सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे संपर्क साधावा. याबाबत विभागीय कार्यालयाकडे शासनाने विहित नोंदणी शुल्क भरल्यानंतर पुढील औपचारीक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

७. मागील शैक्षणिक वर्षातील खंडतेनंतर मान्यता सुरू ठेवण्याबाबत ज्या विद्यमान संस्थानी अर्ज केले असल्यास अशा संस्थानी परिषदेस सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयात दि. ०५.०२.२०१७ पर्यंत जमा करुन त्याचेशी संपर्क साधावा. त्याचप्रमाणे सदर प्रस्तावावर ठळक अक्षरात **"मागील शैक्षणिक वर्षातील खंडतेनंतर मान्यता सुरू ठेवणे "** असे नमूद करावे.

८. विद्यमान पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थाना कळविण्यात येते की, त्यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत या संचालनालयाच्या अधिपत्याखालील सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे जमा करावी.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

१) सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर त्यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणी दि. २१.०८.२०१३ अन्वये शासनाने निर्धारीत केलेले

---

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/मान्यता/२०१७/ 263
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 30 JAN 2017

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-

१) प्राचार्य, सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, सोबतच्या अधिसूचनेच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.